# वार्तापत्र

कार्यालय पोलीस अधीक्षक
गडचिरोली दि. ०१/१०/२०१७

## गिट्टीखदान व मौजा साखेरा येथे भव्य जनजागण मेळावा संपन्न

उपविभाग धानोरा अंतर्गत पोमके मुरुमगांव हद्दितील छत्तीसगढ सीमेला लागून असलेल्या संवेदनशील अशा गिट्टीखदान (उमरपाल) या गावात भव्य जनजागरण मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते.

सदर मेळाव्यात सामुहिक विवाह सोहळयामध्ये एकूण ९ जोडपे विवाहबध्द झाले. विवाहबध्द झालेल्या सर्व ९ जोडप्यांना नवीन कपडे, साडी व उपयोगी वस्तू देण्यात आल्या. अतिशय उत्साही वातावरणात विवाह सोहळा पार पडला. तसेच उपस्थित सर्व जनसमुदायाला शासनाच्या योजनांबाबत मार्गदर्शन करण्यात आले. तसेच त्यांच्या समस्याही जाणून घेण्यात आल्या. यावेळी पोलीस अधिकारी/कर्मचारी व इतर विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

याचबरोबर उपविभाग पेंढरी अंतर्गत येणाऱ्या पोमके कारवाफा हद्दितील साखेरा येथे उपविभागीय पोलीस अधिकारी पेंढरी डॉ. शिवपुजे यांच्या उपस्थितीत भव्य जनजागरण मेळावा आयोजीत करण्यात आला होता. यामध्ये साखेरा, फुलबोडी, रेखाटोला, उशीरपार इ. गावातील जनसमुदाय मोठया प्रमाणात सहभागी झाला होता. कार्यक्रमास वनविभागाचे अधिकारी प्राथमिक आरोग्य केंद्र अधिकारी तसेच इतर शासकीय विभागाच्या अधिकाऱ्यांनी उपस्थित राहून मार्गदर्शन केले. याचबरोबर शासनाच्या नव-नवीन योजनांची माहिती देखील दिली. सदर मेळाव्यात सांस्कृतीक कार्यक्रम, क्रिडा स्पर्धा व बक्षिस वितरण तसेच गरजुंना कपडे व इतर साहित्य वाटप करण्यात आले. याचबरोबर सर्वांची रक्तगट तपासणीही करण्यात आली. यानंतर जनजागरण मेळाव्याची सांगता भोजनाने करण्यात आली.










